# महाराष्ट्र विधानसभा

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

**बुधवार, दिनांक १२ नोव्हेंबर, २०१४**
**(सकाळी ११.०० वाजता)**

**एक : अध्यक्षांची निवडणूक**

**दोन : विरोधी पक्ष नेत्यांच्या नियुक्तीबाबत घोषणा.**

**तीन : ॲड.आशिष शेलार, वि.स.स. यांचा म.वि.स. नियम २३ अन्वये प्रस्ताव :-**

"महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रीमंडळावर ही विधानसभा पूर्ण विश्वास व्यक्त करीत आहे."

**(विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांच्या संयुक्त बैठकीत राज्यपालांचे अभिभाषण दुपारी ४.०० वाजता होईल).**

अभिभाषण संपल्यानंतर २० मिनिटांची विश्रांती राहील.

त्यानंतर विधानसभेच्या दिवसाच्या कामकाजाचा क्रम पुढीलप्रमाणे राहील.

**चार** : राज्यपालांच्या अभिभाषणाची प्रत सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात येईल.

**पाच** : राज्यपालांच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रदर्शनाचा प्रस्ताव.

**सहा** : मंत्र्यांचा परिचय.

**सात : पुढील अध्यादेश सभागृहासमोर ठेवण्यात येतील :-**

**(१) मुख्यमंत्री** : (क) सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १३ - महाराष्ट्र राज्य शैक्षणिक आणि सामाजिकदृष्ट्या मागास (ईएसबीसी) प्रवर्गाकरिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४ सभागृहासमोर ठेवतील.

(ख) सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १४ - महाराष्ट्र राज्य विशेष मागास प्रवर्ग-अ (एसबीसी-ए) करिता (राज्यातील शैक्षणिक संस्थांमधील जागांच्या प्रवेशाचे आणि राज्याच्या नियंत्रणाखालील लोकसेवांमधील नियुक्त्यांचे किंवा पदांचे) आरक्षण अध्यादेश, २०१४ सभागृहासमोर ठेवतील.

(ग) सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १५ - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अध्यादेश, २०१४ सभागृहासमोर ठेवतील.

**(२) महसूल मंत्री** : सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १७ - महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१४ सभागृहासमोर ठेवतील.

**(३) उच्च व तंत्र शिक्षण मंत्री** : सन २०१४ चा अध्यादेश क्रमांक १६ - महाराष्ट्र विद्यापीठ (सुधारणा) अध्यादेश, २०१४ सभागृहासमोर ठेवतील.

**आठ** : विधानसभेने संमत केलेल्या विधेयकांना विधानपरिषदेची संमती व दोन्ही सभागृहांनी संमत केलेल्या विधेयकांना राष्ट्रपती/ राज्यपालांची अधिसंमती मिळाल्याचे जाहीर करण्यात येईल.

**नऊ** : **शोक प्रस्ताव -**

श्री.मोहम्मद फजल माजी राज्यपाल, सर्वश्री सुंदरराव आबासाहेब सोळंके, शंकरराव दौलतराव गेडाम, साबीर हाजीकरीम शेख, विजयसिंह तथा बापुसाहेब गोपाळराव प्रभुगावकर, मोहन महादेव पाटील, माजी वि.स.स. व मंत्री, श्री.सुर्यकांत जागोबाजी डोंगरे माजी उपाध्यक्ष, विधानसभा, सर्वश्री पुरुषोत्तम काळू तथा पी.के.अण्णा पाटील, मालोजीराव सदाशिव मोगल, किसनराव बाबुराव बाणखेले, उमर अजीज काझी, भुजंगराव मुकुंदराव बगडे, नेताजी तानबाजी राजगडकर, प्रद्युम्न उमियाशंकर महेता, जगाराव रावजी चव्हाण माजी वि.स.स. व श्री.गोविंद मक्काजी राठोड, वि.स.स. यांच्या दु:खद निधनाबद्दल शोक प्रस्ताव.

**" राष्ट्रगीत "**

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ११ नोव्हेंबर, २०१४

**डॉ. अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानसभा.